शासकीय सेवेतील नेमणूकीबाबतच्या सवलतींसाठी स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या नामनिर्देशन प्रमाणपत्र तपासणीसाठी/पडताळणीसाठी यंत्रणा निर्माण करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:एसएफएस-१०९७/५६७/प्र.क्र.४०/९७/१६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक: २४ जुन, १९९७

वाचा :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसएफएस-१०८४/सीआर-१०३/१६-अ, दिनांक १० जानेवारी, १९८५

२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसएफएस-१०८२/३४९९/सीआर-३८/८५/१६-अ, दिनांक २२ नोव्हेंबर, १९८५

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसएफएस-१०८७/३४६२/सीआर-५५/८८/१६-अ, दि. ३० नोव्हेंबर, १९८८

४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसएफएस-१०८७/४९९/प्र.क्र.१९/१६-अ, दि. ४ मार्च, १९९१

शासन निर्णय :-

स्वातंत्र्य सैनिकांना शासकीय सेवेत वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदावर भरतीसाठी शासन निर्णय, दि. १२.१०.१९६५ च्या परिपत्रकानुसार काही सवलती दिलेल्या आहेत. सदर सवलती मुख्यत: स्वातंत्र्य सैनिकांसाठी आहेत. परंतु वार्धक्यामुळे/आजारपणामुळे, इत्यादी कारणांमुळे स्वतः स्वातंत्र्य सैनिक या नोकरी विषयक सवलती घेण्यास असमर्थ असतील त्यावेळी ते त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील एका व्यक्तीला या सवलतींचा फायदा घेण्यासाठी नामनिर्देशित करु शकतील.

२. स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे नामनिर्देशित यांना नोकरी देण्याचे अधिकार सर्व नियुक्ती अधिकारी/विभाग प्रमुख यांना दिले आहेत. अशी नियुक्ती फक्त स्वातंत्र्य सैनिकाच्या एकाच नामनिर्देशित व्यक्तीस मिळू शकते. परंतु शासनामध्ये नोकरी मिळण्याकरिता एकापेक्षा अधिक व्यक्तींना नामनिर्देशित करण्यात आले आहे काय, ही पडताळणी होण्याच्या दृष्टीने नियुक्ती अधिकाऱ्यांनी त्यांच्याकडे परस्पर आलेल्या अर्जावर विचार करताना नियुक्तीपूर्वी जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून स्वातंत्र्य सैनिकांनी एकापेक्षा अधिक नामनिर्देशितांना प्रमाणपत्र दिले आहे काय याची खात्री करुन घेण्याबाबत शासन परिपत्रक दि. ४.३.९१ अनुसार सूचना देण्यात आलेल्या आहेत. याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी स्वातंत्र्य सैनिक व त्यांचे नामनिर्देशित व्यक्तींच्या नावाची यादी ( नोंदणीत वेळोवेळी उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारे) ठेवावी म्हणजे जिल्हाधिकाऱ्यांना पडताळणी करणे सोपे जाईल व अशाप्रकारे ना-हरकत प्रमाणपत्र जिल्हाधिकारी संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यास देऊ शकतील. उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयानुसार स्वातंत्र्य सैनिकांना नोकरी विषयक सवलत घेण्यासाठी कोणास नामनिर्देशित करता येते व त्याची कार्यपद्धती

(पु.पा.प.)

काय आहे, याबाबत सविस्तर खुलासा करण्यात आलेला आहे.

३. श्री. आर. डी. दाभुते विरुद्ध महाराष्ट्र शासन या मूळ याचिका क्र. १२७/९७ बाबत महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने स्वातंत्र्य सैनिकांनी केलेल्या नामनिर्देशन पत्राची पडताळणी करण्यास योग्य अशी यंत्रणा शासनाने प्रस्थापित केली नसल्यामुळे बऱ्याच स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित व्यक्तींची पत्रे बनावट/खोटी असल्याबाबतच्या तक्रारी करण्यात येऊन त्यांना नोकरीवरुन निलंबित करण्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यामुळे या नामनिर्देशनाद्वारे नेमलेल्या कर्मचाऱ्यांची कोणत्याही स्तरावर कोणत्याही वेळी पुन्हा पुन्हा चौकशी करण्यात येते. त्यामुळे ते कर्मचारी एका वेळी दोषी तर दुसऱ्या वेळी निर्दोष असल्याचे आढळून येते. अशाप्रकारच्या त्रुटी न्यायाधिकरणाने निदर्शनास आणलेल्या आहेत आणि त्यावर उपाय म्हणून शासनाकडे नामनिर्देशनाबाबत केलेल्या तक्रारी पडताळणीकरिता योग्य ती यंत्रणा असावी, असे नमूद केले आहे.

४. शासन असा आदेश देत आहे की,

जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली चौकशी कक्ष नेमण्यात यावा. सदर चौकशी कक्षाने पुढील मार्गदर्शक तत्वाच्या अनुषंगाने चौकशी अधिकाऱ्यांनी योग्य ती कार्यवाही करावी.

१) नामनिर्देशन पत्राची सिध्दी प्रत्यक्ष तपासण्यासाठी/चौकशी करण्यासाठी प्राधिकारी नेमण्यात यावे.
२) सदर प्राधिकाऱ्यांनी नियमानुसार कार्यवाही करावी.
३) शासन सेवेतील कर्मचाऱ्यास कमी करण्याबाबतची नियमानुसार योग्य असलेली पद्धत अनुसरण्यात यावी.
४) ज्या मूळ नामनिर्देशनाद्वारे नोकरी देण्यात आली होती, ते खोटे/बनावट होते, याची शहानिशा करुन योग्य निर्णय घेण्यात यावा.
५) सदर नामनिर्देशनपत्राची एकदा चौकशी केल्यानंतर त्याची पुन्हा पुन्हा चौकशी करण्यात येऊ नये. तसेच नामनिर्देशनपत्र बनावट/खोटे आढळून आल्यास संबंधित कर्मचाऱ्यावर विहित शासकीय पद्धती अवलंबून नियमानुसार कार्यवाही करावी.

सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी वरील आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव/स्वीय सहायक,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* संचालक, सेवायोजन, मुंबई,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
मंत्रालयीन विभागांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
सामान्य प्रशासन विभाग / स्वातंत्र्य सैनिक कक्ष.
* पत्राने,